दोघांचे भांडण; भारताला लाभ

भारतीय सोयाबीनवरचा आयात कर कमी करण्याचा निर्णय

पीटीआय, बीजिंग

भारत व आशिया पॅसिफिक देशातून येणाऱ्या सोयाबीनवरचा आयात कर कमी करण्याचे चीनने ठरवले असून त्याची अंमलबजावणी १ जुलैपासून होत आहे. अमेरिकेने चीनच्या वस्तूंवर आयात कर वाढवल्यानंतर चीनने अमेरिकी सोयाबीनवर आयात शुल्क वाढवले आहे. चीनच्या मंत्रिमंडळाने भारत व आशिया पॅसिफिक देशातून येणाऱ्या सोयाबीनवरचा कर कमी करण्याचा निर्णय घेतला.

भारत, दक्षिण कोरिया, बांगलादेश, लाओस, श्रीलंका या देशांतून येणाऱ्या सोयाबीनवर आधी तीन टक्के आयात कर होता तो आता शून्य टक्के केला जाईल असे चीनच्या मंत्रिमंडळाने म्हटले आहे. या देशातून येणारी काही रसायने, कृषी उत्पादने, वैद्यकीय उपकरणे, कपडे, पोलाद, ॲल्युमिनियम उत्पादनांवरचा आयात कर कमी करण्याचे चीनने ठरवले आहे. या सर्व देशातून येणाऱ्या मालावर आशिया-पॅसिफिक व्यापार कराराच्या दुसऱ्या दुरुस्तीनुसार आयात कर लागू होईल. अमेरिकी अध्यक्ष ट्रम्प यांनी चीनला द्विपक्षीय व्यापार तूट ३७५ अब्ज डॉलर्सनी कमी करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. या सगळ्या स्थितीचा फायदा घेऊन भारताने चीनला बाजारपेठ खुली करून औषधे, माहिती तंत्रज्ञान उत्पादने या क्षेत्रात वाव देण्याची विनंती केली होती.

भारत-चीन यांच्यात एप्रिलमध्ये झालेल्या संवादाच्यावेळी नीती आयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार यांनी भारतातून चीनला साखर व सोयाबीन निर्यात करण्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

वुहान येथे मोदी व क्षी जिनपिंग यांच्यात शिखर बैठकीनंतर दोन्ही देशांनी निर्यात वाढवण्याचे ठरवले होते. तांदूळ, साखर, औषधे, कर्करोगाची औषधे यांची निर्यात भारतातून चीनला करण्याचा मुद्दा त्यावेळी मोदी यांनी उपस्थित केला होता.

ट्रम्प यांच्या मुस्लीमबंदीच्या निर्णयाला न्यायालयाची मान्यता

वृत्तसंस्था, वॉशिंग्टन

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही मुस्लीमबहुल देशांतील नागरिकांच्या अमेरिका प्रवेशावर लागू केलेल्या बंदीला तेथील सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली. ट्रम्प यांच्यासाठी हा मोठा विजय मानला जात आहे.

ट्रम्प यांनी सप्टेंबरमध्ये जारी केलेल्या आदेशानुसार इराण, लिबिया, सोमालिया, सीरिया आणि येमेन या देशांतील नागरिकांच्या अमेरिकेतील प्रवेशावर निर्बंध लादले होते. अमेरिकेवर होणाऱ्या संभाव्य दहशतवादी हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे ट्रम्प यांनी सांगितले होते. गेले काही महिने या निर्णयावरून अमेरिकेत गदारोळ माजला होता आणि हा निर्णय न्यायालयीन लढाईत अडकला होता. त्याला अमेरिकेतील कनिष्ठ न्यायालये आणि काही राज्यांनी विरोध केला होता. या निर्णयावरील न्यायालयीन लढा सुरू असतानाच सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या अंमलबजावणीस हंगामी मान्यता दिली होती. आता सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमंडळाचा निकाल ५ विरुद्ध ४ मतांनी ट्रम्प यांच्या बाजूने लागला आहे.

सरन्यायाधीश जॉन रॉबर्ट्स यांनी निकाल देताना म्हटले की, ट्रम्प यांचा हा आदेश किती योग्य आहे यावर न्यायालय भाष्य करणार नाही. पण देशाच्या सुरक्षेच्या निश्चितीसाठी हा निर्णय घेत असल्याच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सरकारने पुरेसे स्पष्टीकरण दिले आहे. या आदेशाला विरोध करणारे त्यांच्या दाव्याचे समर्थन करण्यात कमी पडले आहेत. या आदेशामुळे अमेरिकी राज्यघटना किंवा स्थलांतर नियमांचे उल्लंघन होत आहे ही बाब पटवून देण्यात त्यांना अपयश आले आहे.

न्यायालयाच्या या निकालामुळे ट्रम्प यांचा मुस्लीमबंदीचा आदेश देशभर लागू करण्यातील अडचणी दूर झाल्या आहेत. तसेच ट्रम्प यांना यापुढे बंदी असलेल्या देशांच्या यादीत नवीन देशांचा समावेश करण्याचीही मुभा मिळाली आहे.

कर्जबुडव्यांचा 'पोस्टर बॉय' बनवले – मल्या

नवी दिल्ली : बँकांचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज बुडवून परदेशात पसार झालेला मद्यसम्राट विजय मल्या याने आपली बाजू मांडण्यासाठी आता कांगावा केला आहे. कर्जाची परतफेड करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले तरीही आपल्याला कर्ज बुडविणाऱ्यांचा 'पोस्टर बॉय' बनविण्यात आले आहे, असे मल्या याने म्हटले आहे.

सध्या ब्रिटनमध्ये असलेल्या मल्याने एका प्रसिद्धिपत्रकाद्वारे आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्र्यांना १५ एप्रिल २०१६ रोजी पत्र पाठवून आपली बाजू मांडली होती. मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आता ते पत्र जाहीर करणार असल्याचे मल्या म्हणाला. हे सर्व राजकीय हेतूने प्रेरित होऊन केले असल्यास आपण त्याबाबत काहीच करू शकत नाही, असेही मल्याने म्हटले आहे.

पारपत्राच्या नियमांमध्ये बदल

सुषमा स्वराज यांच्याकडून ॲपचे अनावरण

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

पारपत्र काढताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने नियमांमध्ये बदल केले आहेत. आता घरबसल्या मोबाइल ॲपद्वारे देशाच्या कोणत्याही ठिकाणाहून पारपत्रासाठी अर्ज करता येणार आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पारपत्र घरपोच होणार असून त्यासाठी पारपत्र सेवा ॲपचे अनावरण करण्यात आले आहे. डिजिटल इंडिया या मोहिमेअंतर्गत परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी पारपत्र सेवा दिवसाच्या निमित्ताने ही घोषणा केली आहे.

या बाबत माहिती देताना परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी काही अडचणींचा उल्लेख केला आणि त्या संपविण्यात आल्याचे स्पष्ट केले. आता पारपत्र काढण्यासाठी विवाहाच्या प्रमाणपत्राची गरज नाही, असे त्या म्हणाल्या. पारपत्रासाठीचे अनेक जुने आणि अडचणींचे नियम बदलण्यात आले असून सामान्य व्यक्तीच्या दृष्टिकोनातून सरळ-सुटसुटीत नियम बनविण्यात आले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

सर्वाधिक अडचणी जन्मदाखल्यावरून येत होत्या, मात्र त्याऐवजी आता दुसऱ्या सात-आठ कागदपत्रांचा समावेश करण्यात आला आहे. नव्याने समावेश केलेली ही कागदपत्रे सहजतेने उपलब्ध होणारी आहेत. आधार कार्ड, वाहन परवाना किंवा सरकारकडून त्यासारख्या दिल्या जाणाऱ्या अन्य कागदपत्रांवरील जन्मतारीख ग्राह्य धरण्यात येणार आहे.

अनाथालयातील मुलांसाठी तेथील प्रमुख जी जन्मतारीख देतील ती ग्राह्य धरण्यात येणार आहे तर साधू-संतांच्या बाबतीत त्यांच्या पालकांऐवजी गुरूचे नाव ग्राह्य धरण्यात येणार आहे. घटस्फोटित महिलांना त्यांच्या आधीच्या पतीचे नाव पारपत्रासाठी अर्ज करताना विचारण्यात येणार नाही. गुगलच्या प्लेस्टोअरवरून पारपत्र सेवा ॲप डाऊनलोड करता येणार आहे. या ॲपद्वारे पारपत्राशी निगडित सर्व कामे करता येणार आहेत.

सरकारी कर्मचाऱ्यांचा 'ओटी' बंद

पीटीआय, नवी दिल्ली

संचालन व औद्योगिक कर्मचारी वगळता सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना जादा कामाचा भत्ता (ओटी) देणे बंद करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. सातव्या वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. खर्च विभागाने सांगितले की, सरकारने गेल्या काही वर्षात वाढलेले वेतन बघता सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार जादा कामाचे वेतन किंवा भत्ता देणे बंद करण्याचे ठरवले आहे. विविध प्रवर्गांसाठी हा नियम लागू केला असून त्यात औद्योगिक व संचालन कर्मचारी यांचा समावेश असणार नाही. भारत सरकारची सर्व मंत्रालये व विभाग यांच्यासाठी हा निर्णय लागू राहणार असून ज्यांना जादा कामाचे पैसे मिळणार आहेत, अशा संचालन कर्मचाऱ्यांत फक्त विद्युत, यांत्रिकी कर्मचारी व इतर काहींचा समावेश आहे. मंत्रालये व सरकारी विभागांना संचालन कर्मचाऱ्यांची यादी देण्यास सांगण्यात आले आहे. ओव्हरटाइमचे पैसे मिळण्यासाठी बायोमेट्रिक उपस्थिती सक्तीची करण्यात आली आहे.

हार्ले डेव्हिडसन कंपनीवर ट्रम्प यांची जोरदार टीका

पीटीआय, वॉशिंग्टन

हार्ले डेव्हिडसन मोटारसायकलवर भारताने जास्त आयात कर लावण्याबाबत आक्षेप घेणाऱ्या अमेरिकी अध्यक्ष ट्रम्प यांनी आता हार्ले डेव्हिडसनने या गाडीचे उत्पादन काही प्रमाणात परदेशात सुरू केल्याबाबत कंपनीवर टीकेची झोड उठवली आहे. एकीकडे आम्ही हार्ले डेव्हिडसनची बाजू लावून धरण्याचा प्रयत्न करीत आहोत पण या कंपनीने त्यांचे उत्पादन युरोपीय समुदायातील देशात हलवण्याचे ठरवले आहे हे योग्य नाही, असे ट्रम्प यांनी सांगितले. युरोपीय समुदायाने हार्ले डेव्हिडसनवरील आयात शुल्क वाढवल्यानंतर आता कंपनीने युरोपीय समुदायातील देशातच उत्पादन करण्याचा इरादा जाहीर केला आहे.

ट्रम्प यांनी सांगितले की, हार्ले डेव्हिडसन कंपनीचा निर्णय आश्चर्यकारक असून कंपनीने एक प्रकारे पांढरे निशाण फडकावले आहे. अमेरिकेबाहेर हार्ले डेव्हीडसनचे उत्पादन भारत, ब्राझील व ऑस्ट्रेलियात केले जाते. ट्रम्प यांनी वारंवार भारतात हार्ले डेव्हिडसन मोटारसायकलवर जास्त आयात शुल्क असल्याबाबत आगपाखड केली होती. त्यामुळे दोन्ही देशांत व्यापार युद्ध सुरू असतानाच आता युरोपनेही ट्रम्प यांना अडचणीत आणले आहे.

कंपनीने काल अमेरिकी रोखे व विनिमय आयोगाला असे सांगितले की, युरोपीय समुदायाने आयात शुल्क सहा टक्क्यांवरून ३१ टक्के केल्याने अमेरिकेतून युरोपीय समुदायात निर्यात केलेल्या मोटारसायकलींची किंमत २२०० डॉलर्सने वाढली आहे. त्यामुळे हा आर्थिक भार सोसण्यापेक्षा आम्ही युरोपीय समुदायातील काही देशांत उत्पादन सुरू करणार आहोत. हार्ले डेव्हिडसन कंपनीने म्हटले आहे की, युरोपीय समुदायातील देशात ९ ते १८ महिन्यांत उत्पादन प्रकल्प सुरू होतील. हार्ले डेव्हिडसन कंपनीसाठी आम्ही एवढी बाजू लावून धरली तरी त्यांनी हा निर्णय घेतला आहे, युरोपीय समुदायाने आयात शुल्क कमी करावे यासाठी प्रयत्न केले होते, कर १५१ अब्ज डॉलरनी कमीही करण्यात आला होता.

वडाळ्यातील इमारतीच्या वाहनतळाची जागा पुन्हा खचली

प्रतिनिधी, मुंबई

बाजूच्या बहुमजली इमारतीच्या बांधकामामुळे खोदण्यात आलेल्या खड्ड्यामुळे वडाळ्याच्या दोस्ती पार्क परिसरातील 'लॉयेट्स इस्टेट' इमारतीच्या वाहनतळाची जागा मंगळवारी सकाळी पुन्हा खचली. रहिवाशांच्या डोळ्यादेखत हा प्रकार घडल्याने त्यांच्यामध्ये घबराटीचे वातावरण परसले. खचलेल्या ठिकाणी सिमेंट आणि वाळूचा भराव टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र या भरावाखालील जमीन भुसभुशीत असल्याने परिणामी त्याच्या काही भाग पुन्हा खचला गेला.

नवीन इमारतीच्या बांधकामासाठी खोदकाम सुरू असताना वडाळ्यातील 'लॉयेट्स इस्टेट' (वडाळा हाइट्स) इमारतीच्या डी आणि सी विंगसमोरील जमीन सोमवारी पहाटे खचली गेली. इमारतीच्या संरक्षण भिंतीच्या शेजारी उभ्या करण्यात आलेल्या सुमारे आठ गाड्यांही जमिनीमध्ये खचल्या गेल्या. त्यानंतर तातडीने पालिका अधिकाऱ्यांनी डी आणि सी विंगमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना इमारत रिकामी करण्याचे आदेश दिले होते. प्रसंगावधान राखून तातडीने रहिवाशांनी आपले घर रिकामी केले होते. सोमवारी रात्री परिस्थिती नियंत्रणात आल्यावर रहिवाशांनी पुन्हा आपल्या घराचा ताबा घेतला होता. मात्र काही रहिवासी भीतीपोटी आपल्या स्वतःच्या घरात रात्र काढण्यास तयार नव्हते. मंगळवारी सकाळी खचलेल्या भागाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले.

जमिनीमध्ये खचलेल्या गाड्यांना बाहेर काढल्यानंतर त्या ठिकाणी सिमेंट टाकून उर्वरित भागाला आधार देण्याचे काम सुरू होते. मात्र दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास इमारतीच्या उद्यानाचा काही भाग रहिवाशांच्या डोळ्यादेखत खचला. त्यामुळे पुन्हा एकदा रहिवाशांमध्ये घबराट निर्माण झाली. शेजारील इमारतीच्या बांधकामामुळे इमारतीच्या काही भागांमध्ये कंपने जाणवत असल्याची माहिती आम्ही जून २०१७ मध्ये स्थानिक पालिका प्रशासनाला पत्राद्वारे दिली होती, अशी माहिती इमारतीचे रहिवासी अश्विन देशमुख यांनी दिली. मात्र वर्षभर त्यांनी कोणत्याही प्रकारची हालचाल न केल्यामुळे सोमवारी पहाटे हा प्रकार घडला. त्यानंतर थोड्या फार प्रमाणात जमीन खचण्याचे प्रकार सुरू असल्याने डी आणि सी विंगमधील रहिवाशांनी आपल्या सामानाची बांधाबांध केली असल्याचे त्यांनी सांगितले. पावसाचा जोर वाढल्यानंतर जमिनीचा उघडा राहिलेला काही भाग पुन्हा धसण्याची भीती असल्याची माहिती इमारतीचे सचिव प्रणब प्रेमचंद यांनी दिली. तसेच सोमवारी आपल्या खोल्या रिकामी करून गेलेले रहिवाशी पुन्हा आले असले तरी जमिनीचा काही भाग अजूनही धसत असल्याने सर्तकतेचा इशारा प्रत्येक रहिवाशाला देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर मुंबई क्रॉंग्रेसतर्फे संजय निरुपम यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी महापालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या दुर्घटनेबाबत दोषी असणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई आणि दोस्ती बिल्डरच्या मालकांना अटक करावी या मागण्या घेऊन मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती निरुपम यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

गुन्हा नोंद

दोस्ती एकर जमीन खचल्यानंतर ॲन्टॉपहिल पोलिसांनी दोस्ती रिॲलिटी कंपनीचे मालक दीपक गरोडीया, अध्यक्ष किशन गरोडीया आणि संचालक राजेश शहा यांच्यासह महापालिकेच्या एफ उत्तर विभाग कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा नोंदवला. या गुन्ह्यातील कलमे जामीनपात्र आहेत. तसेच दोष सिद्ध झाल्यास सात वर्षांपेक्षा कमी शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यालयाच्या आदेशानुसार या गुन्ह्यातील संशयित आरोपींना फौजदारी दंड संहितेतील कलम ४१ नुसार नोटीस बजावून चौकशीस हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. तसेच या अपघाताबाबत पालिकेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. त्यानंतर पालिका अधिकाऱ्यांवरील जबाबदारी स्पष्ट केली जाईल, अशी माहिती ॲन्टॉपहिल पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुदर्शन पैठणकर यांनी लोकसत्ताला दिली.

TATA
TATA STEEL LIMITED
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, टाटा स्टील लिमिटेड ('कंपनी') ची १११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') ही खालील कामकाज करण्यासाठी बिर्ला मातोश्री सभागार, १९, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई- ४०० ०२० येथे शुक्रवार, २० जुलै, २०१८ रोजी दु. ३.०० वा. (भाप्रवे) घेण्यात येणार आहे :

१. ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता कंपनीचे लेखापरिक्षित अलिप्त वित्तीय विवरणपत्र आणि त्यावरील संचालक मंडळाचा आणि लेखापरीक्षकांचा अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे;
२. ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता कंपनीचे लेखापरिक्षित एकत्रित वित्तीय विवरणपत्र आणि त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे;
३. (I) आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी प्रत्येकी रु. १०/- दर्शनी मूल्याच्या संपूर्ण भरणा झालेल्या सामान्य (इक्विटी) शेअर वर रु. १०/-, आणि (II) आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी प्रत्येकी रु. १०/- च्या आंशिक भरणा झालेल्या सामान्य (इक्विटी) शेअर वर रु. २.५०४ (प्रति शेअर रु. २.५०४ भरणा झालेले) चा लाभांश घोषित करणे;
४. श्री. एन. चंद्रसेकरन (डीआयएनः००१२१८६३) जे यथाक्रम निवृत्त होत आहेत आणि पात्र असल्याने पुनर्नियुक्तीस इच्छुक आहेत त्यंच्या जागी संचालकांची नियुक्ती;
५. एक संचालक म्हणून श्री. सौरभ अग्रवाल (डीआयएनः०२१४४५५८) यांची नियुक्ती;
६. कार्यकारी संचालक आणि मुख्य वित्तीय अधिकारी असा हुद्दा असणारे पूर्ण वेळ संचालक म्हणून श्री. कौशिक चॅटर्जी (डीआयएनः०००४९८९) यांची पुनर्नियुक्ती आणि पारिश्रमिकाचे प्रदान;
७. कंपनीचे कॉस्ट ऑडिटर्स मेसर्स शोम ॲण्ड बॅनर्जी यांच्या पारिश्रमिकाची दुरुस्ती;
८. रु. १२,००० कोटीपेक्षा अधिक नसलेल्या प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर नॉन कन्व्हर्टिबल डिबेंचर्सचे निर्गमन.

एजीएमच्या सूचनेसह वित्तीय वर्ष २०१७-१८ करिता ३ रा एकत्रित अहवाल आणि १११ वा वार्षिक लेखा, अटेंडन्स स्लिप आणि प्रतिपत्री पपत्र हे कंपनी/ डिपॉझिटरीज पार्टिसिपंटस्कडे ईमेल पत्ते नोंदविलेल्या सभासदांना ईमेल करण्यात आले आहे. एजीएमच्या सूचना, अटेंडन्स स्लिप आणि प्रतिपत्री प्रपत्रासह वित्तीय वर्ष २०१७-१८ करिता एकत्रित अहवाल आणि वार्षिक लेखाची प्रत्यक्ष प्रत त्यांचे ईमेल पत्ते न नोंदविलेल्या सभासदांना परवानगी असलेल्या पध्दतीने पाठविण्यात आली आहे. कंपनीने इमेल पाठविणे तसेच पोस्टाने पाठविण्याचे काम मंगळवार २६ जून, २०१८ रोजी पूर्ण केले आहे. एजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com वर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) च्या वेबसाईट www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८, वेळोवेळीच्या सुधारणेनुसार कंपनीज (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ च्या नियम २० आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ आणि दि इन्स्टिट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाद्वारे जारी सेक्रेटरीयल स्टॅण्डर्ड ऑन जनरल मिटिंग्ज (एसएस२) अनुसार कंपनीला एनएसडीएलद्वारे पुरविलेल्या एजीएमच्या ठिकाणाच्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान पध्दत ('दूरस्थ ई-मतदान') वापरुन एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मतदान करण्यासाठी तिच्या सर्व सभासदांना दूरस्थ ई-मतदान सुविधा पुरविल्याचा आनंद होत आहे आणि अशा मतदानामार्फत कामकाज करता येईल. मतदानाचे हक्क कट ऑफ तारीख म्हणजेच शुक्रवार, १३ जुलै, २०१८ रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलामधील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणांत राहतील. कोणीही व्यक्ती जी कट ऑफ तारखेस कंपनीची सभासद आहे व डिमटेरिअलाईज्ड किंवा प्रत्यक्षांत शेअर्स धारक आहेत ती एजीएममध्ये मतदान किंवा दूरस्थ ई-मतदान वापरुन एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यासाठी पात्र राहील.

दूरस्थ ई-मतदानाचा कालावधी सोमवार, १६ जुलै, २०१८ (स. ९.०० वा. भाप्रवे) सुरू होईल आणि गुरुवार १९ जुलै, २०१८ (सायं. ५.०० वा. भाप्रवे) संपेल. सदर कालावधीच्या दरम्यान सभासद इलेक्ट्रॉनिकली त्यांचे मतदान करू शकतात. दूरस्थ ई-मतदान मॉड्युल्ड त्यानंतर एनएसडीएलद्वारे बंद करण्यात येईल. सभासदाने ठरावावर एकदा केलेल्या मतदानात सभासदाला त्यानंतर बदल करण्याची परवानगी देण्यात येणार नाही. इलेक्ट्रॉनिक मतदान पध्दतीने किंवा बॅलट पेपरमार्फत मतदानाची सुविधा एजीएममध्ये सुध्दा उपलब्ध करण्यात येईल आणि ज्या सभासदांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे अगोदर त्यांचे मतदान केलेले नाही त्यांना एजीएममध्ये त्यांचा हक्क वापरणे शक्य होईल. ज्या सभासदांनी एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान केलेले आहे ते सुध्दा एजीएमला हजर राहू शकतात परंतु पुन्हा त्यांचे मतदान करण्यासाठी हक्कदार नाहीत.

ज्या व्यक्तींनी एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे भाग संपादित केलेले आहेत आणि सभासद बनले आहेत आणि शुक्रवार, १३ जुलै, २०१८ या कट ऑफ तारखेस भाग धारण केलेले आहेत ते evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवून लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतात. तथापि, त्या व्यक्तीने दूरस्थ ई-मतदानाकरिता एनएसडीएलकडे अगोदर नोंदणी केली असल्यास ते मतदान करण्यासाठी विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात. पर्याय म्हणून जर तुम्ही आधीच एनएसडीएल ई-सर्व्हिसेस म्हणजेच IDeAS कडे नोंदणीकृत असाल तर तुम्ही इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तुमचे मत देण्यासाठी सध्याचा IDeAS लॉगइन व पासवर्ड वापरून https://eservices.nsdl.com वर लॉगीन करू शकतात. जर कोणीही व्यक्ती त्यांचा पासवर्ड विसरला असल्यास ते www.evoting.nsdl.com वर उपलब्ध पर्याय "Forgot User details/Password?" किंवा "Physical User Reset Password" वापरुन त्यांचा पासवर्ड रिसेट करू शकतात किंवा टोल फ्री क्र. १८००-२२२-९९० किंवा ईमेल evoting@nsdl.co.in येथे एनएसडीएलकडे संपर्क साधावा.

दूरस्थ ई-मतदानाशी संबंधित तपशिलाकरिता कृपया एजीएमच्या सूचनेचा संदर्भ घ्यावा. ई-मतदानाशी संबंधित कोणत्याही चौकशीकरिता कृपया सभासदांसाठी असलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्युज) चा संदर्भ घ्यावा आणि सभासदांकरिता दूरस्थ ई-मतदानावरील युजर मॅन्युअल www.evoting.nsdl.com च्या ''डाऊनलोड सेक्शन'' मध्ये उपलब्ध आहे किंवा टोल फ्री क्र. १८००-२२२-९९० वर फोन करावा किंवा evoting@nsdl.co.in वर ईमेल करावा. ई-मतदान सुविधेशी संबंधित कोणत्याही तक्रारींकरिता कृपया श्री. अमित विशाल, वरिष्ठ व्यवस्थापक, एनएसडीएल, ४ था मजला, 'ए' विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई- ४०००१३. ईमेल: amitv@nsdl.co.in किंवा evoting@nsdl.co.in. फोन : +९१ २२ २४९९ ४३६०/ १८००-२२२-९९० यांना संपर्क करावा.

सभेला हजर राहून मतदान करण्यासाठी हक्कदार असलेल्या व्यक्ती व्यक्तिशः किंवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत प्रतिपत्री व्यक्तीद्वारे मतदान करू शकतात, मात्र प्रतिपत्री व्यक्तींनी सभेला हजर राहून मतदान करण्यासाठी हक्कदार असलेल्या व्यक्तीने यथायोग्य सही केलेले विहित प्रपत्र/प्राधिकारपत्र एजीएमपूर्वी किमान ४८ तास अगोदर कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
पार्वथीसम के
कंपनी सचिव

२६ जून, २०१८
मुंबई

TATA STEEL

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद
(भारत सरकारची संवैधानिक संस्था)
नेल्सन मंडेला मार्ग, वसंत कुंज, नवी दिल्ली-११० ०७०
दूर.क्र. ०११-२९५८१०००. २६१३१५६९ संकेतस्थळ : www.aicte-india.org

जाहीर सूचना

विद्याशाखा विद्यार्थी प्रमाण बदलल्यामुळे अध्यापन विद्याशाखेमध्ये कपात करू नये

एआयसीटीईने विद्यार्थी तसेच संस्थेच्या हितासाठी हल्लीच विद्याशाखा विद्यार्थी प्रमाण १:१५ वरून १:२० असे बदलले आहे. एआयसीटीईने सर्व एआयसीटीई मान्यताप्राप्त संस्थांना यापूर्वीच एआयसीटीईद्वारे ''विद्याशाखा विद्यार्थी प्रमाण मानदंडामध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे अध्यापन विद्याशाखेमध्ये कोणतीही कपात करू नये.'' हे प्रमाण केवळ विद्याशाखेच्या सेवा निवर्तन यावर समायोजित करावे.

याद्वारे अधिसूचित करण्यात येत आहे की, सर्व संस्थांनी विद्याशाखा विद्यार्थी प्रमाणाच्या पुनर्निरीक्षणासाठी विद्याशाखेचे निवृत्तिवेतन किंवा नोंदणी कोणतीही विद्याशाखा कमी करू नये.

राज्य सरकार आणि विद्यापीठ यांनी याची खात्री करावी की, कोणत्याही एआयसीटीई मान्यताप्राप्त संस्थेद्वारे विद्याशाखा विद्यार्थी प्रमाण बदलण्यात आल्यामुळे विद्याशाखा कमी केल्याची खात्री करावी.

जाहिरात क्र. अप्रूवल/०६(०३)/२०१८ सदस्य सचिव, एआयसीटीई

MSME
सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम
MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES
MSME-TECHNOLOGY DEVELOPMENT CENTRE, MUMBAI
IDEMI
(A Govt. of India society)
INSTITUTE FOR DESIGN OF ELECTRICAL MEASURING INSTRUMENTS, MUMBAI
सत्यमेव जयते
(Govt. of India Society)
Ministry of Micro, Small & Medium Enterprises
Organised by IDEMI Mumbai Ministry of MSME Govt. of India
२ दिवसीय व्यवसायिक प्रशिक्षण कार्यक्रम
Government Certificate Course in
SOLAR ENERGY
START UP YOUR OWN SOLAR INDUSTRY
दिनांकः ७ आणि ८ जुलै २०१८ वेळः स. १०.०० ते सायं. ५.३०
स्थळः IDEMI, स्वातंत्र्यवीर तात्या टोपे मार्ग, चुनाभट्टी, सायन, मुंबई.
अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण केल्यावर शासन प्रमाणपत्र देण्यात येईल
Contents: Starting up Solar Business, Installation & Designing of Solar System, Visit to 5kw solar rooftop system, Load Calculation, Government policies for Solar Energy, Opportunities in Solar Energy Business.
For Technical Details : 8800809560

अभ्यासक्रम शुल्कः
रू. ६००० + १८% GST रक्कम खालील नावे IDEMI,Mumbai.(अल्पोपहार व भोजन समाविष्ट)
कोणाकरीता आहेः
इंजिनियर्स, आर्किटेक्ट, होतकरू उद्योजक विद्यार्थी, शेतकरी व सर्वसामान्य व्यक्ती
पुढील तपशीलाकरीता संपर्क करण्याची वेळ स.१० ते सायं.६
Mobile :8806614948 / 8208350291 / 9869087617
चौकशीसाठी आणि नोंदणी करण्याचे ठिकाण
INSTITUTE FOR DESIGN OF ELECTRICAL MEASURING INSTRUMENTS
IDEMI, Swatantryaveer Tatya Tope Marg, Chunabhatti, Sion PO
Mumbai - 400 022. Email ID : training@idemi.org
Web.: www.idemi.org | Ph.: (022) 2405 0301/2/3/4
Document required :
Aadhar card xerox, education document & 2 passport photographs